अस्सल सोलापुरी
# सुराज्य सोलापूर

## चाकूने वार केलेल्या रिक्षाचालकाचा मृत्यू

**सोलापूर** : रिक्षा चालविण्यासाठी नई जिंदगी परिसरात गेलेल्या बाबुलाल शेख याच्यावर त्याचा मित्राने चाकूने वार केला होता. यात गंभीर जखमी झालेल्या बाबुलालचा मृत्यू झाला. सज्जाद रजाक सय्यद (वय ३० रा. चंद्रकलानगर, नई जिंदगी) याच्या विरूध्द खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे.

बाबुलाल जब्बार शेख (रा. मसरे वस्ती, मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर, सोलापूर) हा रिक्षाचालक आहे. तो दि. २३ सप्टेंबर रोजी दुपारी दोनच्या सुमारास नई जिंदगी परिसरातील भिम चौकाजवळील पोल्ट्रींच्या पाठीमागे,चंद्रकला नगर येथे रिक्षा चालविण्यासाठी गेला होता. त्यावेळी त्याचा मित्र सज्जाद सय्यद याने त्यांच्यावर अज्ञात कारणावरून चाकूने वार केले होते. यात शेख गंभीर जखमी झाला होता. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी जखमी बाबुलाल शेख याची आई हसिनाबी जब्बार शेख (वय ५५ रा. मसरे वस्ती) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. यावरून सज्जाद सय्यद याच्या विरूध्द गुन्हा दाखल झाला होता. आरोपीला पोलिसांनी कोर्टापुढे उभे केल्यानंतर दोन दिवसाची पोलिस कोठडी मिळाली होती. तपास स.पो.नि. जाधव हे करित आहेत.



# सोलापूरच्या विकासाला कोणीही रोखू शकत नाही : भाजप

## दोन्ही देशमुख एकत्र, निमित्त विमानतळ पाहणीचे

**सोलापूर/प्रतिनिधी**

माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख आणि माजी सहकारमंत्री आ. सुभाष देशमुख हे विमानतळ पाहणीच्या निमित्ताने शुक्रवारी एकत्र आले. यावेळी दोन देशमुखांमध्ये काहीवेळ चर्चाही झाली. त्यामुळे उपस्थित भाजप पदाधिकाऱ्यांना मात्र आश्चर्य वाटले.

### देशमुखांमधील चर्चेची उत्सुकता

बऱ्याच दिवसांनी आमदार विजयकुमार देशमुख आमदार सुभाष देशमुख हे एकत्र आल्याने चित्र पहवयास मिळाले. शहर उत्तर दक्षिण विधानसभा मतदारसंघात भाजपतील अंतर्गत पदाधिकारी, माजी नगरसेवक एकत्र येत विद्यमान आमदारांना विरोधात भूमिका घेतली आहे. त्यामुळे या दोन्ही मतदार संघाची चर्चा सुरू आहे. त्यातच दोन्ही आमदार देशमुखांनी विमानतळ येथे पाहणी करत भेट झाली यावेळेस दोघात नेमकी कोणती चर्चा झाली.? याची उत्सुकता लागली आहे.

आ. विजय देशमुख, आ. सुभाष देशमुख यांच्यासह भाजपा शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांच्यासह भाजपा पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी सोलापूर विमानतळाची पाहणी केली. याप्रसंगी भाजपाचे सरचिटणीस पांडुरंग दिड्डी, सरचिटणीस रोहिणी तडवळकर, सरचिटणीस विशाल गायकवाड, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष रामप्पा चिवडशेट्टी, माजी सभागृह नेते संजय कोळी, प्रसाद कुलकर्णी यांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती. विमानतळाच्या कामाबाबत यावेळी समाधान व्यक्त करत आमदार आणि भाजपा पदाधिकाऱ्यांनी केंद्र आणि राज्य शासनाचे आभार मानले. सोलापूर विमानतळाचे टर्मिनल मॅनेजर वीरेंद्र ससी यांनी विमानतळाच्या कामांची माहिती दिली. सोलापूरच्या औद्योगिक, शैक्षणिक, वैद्यकीय प्रगतीसाठी सोलापूरात कायमस्वरूपी विमानसेवेची आवश्यकता होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रयत्नांमुळे सोलापुरात विमानसेवा सुरू होत आहे. आता सोलापूरच्या विकासाला कोणीही रोखू शकत नाही, असे उपस्थित पदाधिकाऱ्यांनी सांगितले.



सोलापूर : सोलापूर विमानतळाची पहाणी करताना आ. विजय देशमुख, आ. सुभाष देशमुख यांच्यासोबत नरेंद्र काळे व इतर.

### काँग्रेसला न जमलेले काम भाजपाने केले : काळे

भाजप सोलापुरात विमानसेवा सुरु करु शकत नाही असे चॅलेंज काँग्रेसने दिले होते. पण ४० वर्षे सोलापुरात सत्ता गाजविणाऱ्यांना न जमलेले काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील महायुतीने करून दाखवले आहे, असे शहराध्यक्ष काळे म्हणाले.



## रविवारी होणार विमानतळाचे उद्घाटन

**सोलापूर** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुणे येथील नवीन दौऱ्याची तारीख जाहीर झाली आहे. त्यांच्याच हस्ते रविवारी (दि. २९) पुण्यात मेट्रोचे तर होटगी रोडवरील विमानतळाचे उद्घाटन होणार आहे.

पुण्यामध्ये सुरू असलेल्या पावसामुळे २६ रोजीचा मोदी यांचा दौरा रद्द झाला होता. त्यामुळे सोलापूर विमानतळाचे उद्घाटन झाले नव्हते. आता रविवारी याचे व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे उद्घाटन होणार आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



म्हणून मी 'हप्त्या'वर काही घेत नाही !

| कल्याण |
|---|
| 348-57-359 |

| मुंबई |
|---|
| 189-87-124 |

## उमेश पाटील यांचा पदाचा राजीनामा

**सोलापूर/प्रतिनिधी**

राष्ट्रवादीकाँग्रेस अजित पवार गटाचे राज्याचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. उमेश पाटील यांनी शुक्रवारी आपल्या मोहोळ येथील सावली या निवासस्थानी पत्रकार परिषद घेऊन राजीनामा देत असल्याची घोषणा केली.

मोहोळ तालुक्यातील अनगर या ठिकाणी अप्पर तहसील कार्यालय झाल्याने संपूर्ण मोहोळ तालुक्याने याला विरोध दर्शवला. सर्वपक्षीय बंद पाळण्यात आला. याप्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आली. त्यानंतर हे तहसील कार्यालय कुरुल किंवा कामती या ठिकाणी करावे अशी मागणी करण्यात आली.परंतु काही महसूल मंडळे वगळण्यात येऊन हे कार्यालय त्याच ठिकाणी करण्याचा निर्णय झाला. दरम्यान अजित पवार यांची जन सन्मान यात्रा मोहोळ मध्ये येऊन गेली. त्यावेळी अनगर अपर तहसील कार्यालयाच्या निषेधार्थ मोहोळ बंद ठेवण्यात आले होते. त्या कार्यक्रमात स्वतः अजित पवार आणि पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी उमेश पाटलांवर टीका केली होती.



दरम्यान नाराज झालेल्या उमेश पाटील यांनी आपल्या मुख्य प्रवक्ते पदाचा राजीनामा दिला आहे. पत्रकारांशी बोलताना संपूर्ण मोहोळची जनता या कार्यालयामुळे राजन पाटील आणि आमदार यशवंत माने यांच्या विरोधात असताना पक्षाने त्यांना बळ देण्याचे काम केले. त्यामुळे आपण या पदावर राहणे योग्य नाही म्हणून राजीनामा देत असल्याचे जाहीर केले आहे.

### तरूणाच्या डोक्यात फरशी घातली

## समर्थ गायकवाडसह चौघांविरूध्द गुन्हा दाखल

**सोलापूर/प्रतिनिधी**

विजापूर नाका येथे फायनान्सचे हप्ते थटल्याने मोटारसायकल घेवून जाण्याच्या कारणावरून विशाल जाधव याच्या डोक्यात फरशी घातल्याप्रकरणी समर्थ गायकवाड, लक्ष्मण जाधव, विजय जाधव, आकाश धुमाळ या चौघांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणी विशाल राजू जाधव (वय २३ रा. कलप्पा नगर, एमआयडीसी रोड, सोलापूर) याने विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. २३ सप्टेंबर रोजी १२.३० वाजण्याच्या सुमारास विजापूर नाका येथे समर्थ गायकवाडसह चौघे गाडीचे फायनान्सचे हप्ते भरले नसल्याने ती मोटारसायकल उचलून घेवून जाण्यासाठी गेले होते. या कारणावरून शिवीगाळ करून व जिवे ठार मारण्याची धमकी देवून मारहाण केली. लक्ष्मण जाधव याने खाली पडलेली फरशी विशाल जाधव याच्या डोक्यात मारून त्याला जखमी केले.

### मृत लक्ष्मण जाधववरही गुन्हा

या प्रकरणी स्पर्श फायनान्सचे तुषार कैलास गायकवाड (वय २० रा. सेटलमेंट फ्रि कॉलनी) याने विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. सोमवारी दुपारी दोनच्या सुमारास विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. यात फायनान्स कंपनीचे हप्ते थटल्यामुळे विजापूर रोडवरील नुराणी मश्जिद जवळ मोटारसायकल नेत असताना अविनाश मदनावाले सह चौघांनी शिवीगाळ करून मारहाण केली होती. यावेळी एकाने लक्ष्मण जाधव याच्या डोक्यात फरशी घातली होती. त्यात तो गंभीर जखमी होत मृत झाला.

